# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:-१९०** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.२०/०९/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२६ व दि.२७/०९/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२७ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.२०/०९/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या विशेष सभा क्र.२६ व दि.२७/०९/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२७ चे कार्यवृत्त कायम करणे.

---

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.२०/०९/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या विशेष सभा क्र.२६ व दि.२७/०९/२०२४ शुक्रवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.२७ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र.:-१९१** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. क्रीडा अधिकारी, क्रीडा विभाग यांचेकडिल जा.क्रं./क्रीडा/२७४/२०२४-२५ दि.०३/१०/२०२४

३. उपायुक्त यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिके अंतर्गत जिल्हास्तरीय आंतर शालेय क्रीडा स्पर्धा घेणे व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व क्रीडा अधिकारी, क्रीडा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील आंतरशालेय जिल्हास्तरीय मनपा क्षेत्रातील जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा घेणेबाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रं.शाक्रीधो-१०९६/प्र.क्रं.३३०/क्रीयुसे-१ दि.१४/११/२००३ तसेच जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा क्रीडा परिषद, जळगांव यांचे दि.१६/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये शालेय क्रीडा स्पर्धा महानगरपालिकेने घेणे बंधनकारक असल्याबाबत नमूद आहे.

सन २०२४-२५ या वित्तीय वर्षातील आंतर शालेय जिल्हास्तरीय मनपा क्षेत्रातील जिल्हास्तर शालेय क्रीडा स्पर्धा घेणे बाबत सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभागाकडील शासन निर्णय क्रं.शाक्रीधो-२०१२/प्र.क्रं.१८५/ क्रीयुसे-२ दि.२४/१२/२०१४ तसेच सहा.संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, म.रा.पत्र क्रं.क्रीयुसे/राक्रीस्पआ/२०१५-१६/का-४ दि.०७/०७/२०१५ अन्वये परिशिष्ठ अ मध्ये नमूद खेळानुसार प्रमाणपत्र छपाई, मेडल/ शिल्ड, माहिती पुस्तीका छपाई, स्टेशनरी, संगणक चालक मानधन, हारपुष्प, फोटो, झेराक्स, किरकोळ क्रीडा साहित्य, क्रीडागंणावरील लागणारे आवश्यक बाबी, पंच मानधन, तसेच विविध खेळानुसार होणारा खर्च अंदाजित रक्कम रु.४,००,०००/- अपेक्षित असून सदर खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता तसेच सदर खर्च क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षाखाली केलेल्या रक्कम रु.०५ लक्ष तरतूदी मधून करणेस मान्यता मिळण्यासाठी क्रीडा अधिकारी, क्रीडा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र.:-१९२** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल जा.क्रं./न.र./८१९/२०२४-२५ दि.०४/१०/२०२४

**विषय :-** प्रधान मंत्री जन विकास कार्यक्रम (PMJVK) केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत जिल्हयात संविधान भवन तयार करणे कामी जागा उपलब्ध करुन देणे बाबत.

जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जिनिस/जिवायो/संविधान भवन/२०२४/संसं-२/१६२७ दि.२७/०९/२०२४

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.जिनिस/जिवायो/संविधान भवन/२०२४/संसं-२/१६२७ दि.२७/०९/२०२४ पत्रानूसार जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती,जळगांव यांनी प्रधान मंत्री जन विकास कायक्रम(PMJVK) केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत जिल्हयात संविधान आणि त्याच्या मुल्यांविषयी शिक्षण देणे कामी आणी जागृकतेसाठी समर्पित केंद्र म्हणून प्रत्येक जिल्हयात संविधान भवन तयार करणेसाठी प्रस्ताव सादर करणे बाबत निर्देश प्राप्त झाल्याने संविधान भवन तयार करणे करीता माहानगरपालिका क्षेत्रात जागा उपलब्ध करुन देणे बाबत कळविले आहे.

त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत, पत्रात नमूद निकषानुसार खालीलप्रमाणे जागा सुचविण्यात आल्या होत्या.

| अ.नं. | जागेचे ठिकाण | स.नं./सि.स.नं. | मालकी | जागेची मापे | उपलब्ध क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | ट्राफिक गार्डन पोलिस लाईन (सि.स.नं.८५८० च्या उत्तरेकडील) | जळगांव २७५ पै (सि.स.नं.२५८०) | शासकीय | २२X ३२.५० मी. | ७१५ चौ.मी |
| २ | गेंदालाल घरकुल परिसर | सि.स.नं.२६८६ मधील खुली जागा | म.न.पा. जळगांव | ७२.१२ X ७४.२३ मी. | ५३४५ चौ.मी. |

याबाबत दि.०३/१०/२०२४ रोजी जिल्हाधिकारी यांचे कक्षात वरील विषयाबाबत झालेल्या बैठकीत झालेल्या चर्चेनुसार वरील तक्त्यात नमुद अ.नं.०१ मधील जागा ही शासकीय मालकीची असल्याने जिल्हा प्रशासन या जागेवर संविधान भवन बांधणेची कार्यवाही सरळपणे करु शकत असले तरी जागेचे क्षेत्रफळ कमी असल्याने सदरची जागा बैठकीत चर्चेअंती व्दितीय प्राधान्य देण्यात आले व अ.नं.०२ मधील नमुद केलेली जागा ही संविधान भवन करता उपयुक्त असल्याने या जागेस प्रथम प्राधान्य देण्यात आले.

उक्त जागा ही गेंदालाल मिल घरकुल अभिंन्यासातील खुली जागा असुन म.न.पा मालकीची आहे. त्याचे एकुण क्षेत्र ५३५५.०० चौ.मी आहे. प्रचलीत एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली वि.नि.क्र.३.४.७ मधील अनुज्ञेय वापरानुसार संविधान आणि त्याच्या मुल्यांविषयी शिक्षण देणे हा वापर समकक्ष व विस्तृत स्वरुपातील सार्वजनिक व समाजास उपयुक्त वापर आहे. उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार खुल्या जागेत एकुण १५ टक्के बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय असुन तळ मजल्यावर १० टक्के व पहिल्या मजल्यावर ५ टक्के या प्रमाणे बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होईल. तसेच सदरच्या खुल्या जागेत संविधान भवन बांधल्यानंतर उर्वरीत जागेचा वापर महानगरपालिकेस करता यावा या दृष्टीने 'संविधान भवनचे' बांधकाम नियमानुसार सामासिक अंतरे सोडून पुर्व-उत्तर कोपऱ्यात प्रस्तावित असणे उचित होईल. तसेच खुल्या

जागे पैकी वरील वर्णन केल्याप्रमाणे १० टक्के म्हणजे ५३५.५० चौ.मी क्षेत्र बांधकामासाठी व विषयांकित कामाच्या वापराकरीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तथापि सदरच्या जागेचा मालकी हक्क कायम महानगरपालिकेचा राहील. वरील प्रमाणे अटीशर्ती नूसार जागा देणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :- १९३** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./मनपा/सांबा/१३६९/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४

३. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०४/१०/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत जळगांव शहरातील १ ते ५० विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव मार्फत करण्याबाबत मान्यता देणे.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ व ३ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपविभागीय अधिकारी, सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे पत्र क्र.सांबाविज/१७७५/२०२४ दि.०३/१०/२०२४ चे पत्र प्राप्त झाले त्यानुसार खाली नमूद १ ते ५० कामे हे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजने अंतर्गत या वर्षासाठी शासन निर्णय क्र.सावियो-२०२४/प्र.क्र. ५१७/अजाक मंत्रालय, मुंबई- ४०००३२. दि.०३ ऑक्टोबर २०२४ मंजूर झालेले असून त्या अनुषंगाने खाली नमूद १ ते ५० कामांना शासन निर्णयानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे त्यानुसार वरील प्रमाणे उपविभागीय अधिकारी, सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे दि.०३/१०/२०२४ चे पत्रान्वये १ ते ५० कामांकरीता ना-हरकत प्रमाणपत्र व प्रशासक ठराव मिळण्या संदर्भात कळविले आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| १. | प्रभाग क्र १० अंतर्गत गट नं १८७ मधील मंगलमुर्ती नगर येथील श्री निखील चौधरी यांच्या घराजवळील ओपनस्पेस विकसित करणे. |
| २. | प्रभाग क्र १० अंतर्गत गट नं १८६ मधील वृंदावन कॉलनी येथील श्री प्रसाद जोशी यांच्या घराजवळील ओपनस्पेस विकसित करणे |
| ३. | प्रभाग क्र १० अंतर्गत नामदेव नगर येथील मुन्ना पाटील ते अनिल यादव यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४. | प्रभाग क्र १० अंतर्गत नामदेव नगर येथील मधुकर बारी ते डोलारे यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ५. | प्रभाग क्र १० अंतर्गत नामदेव नगर येथील विकास पाटील ते गणेश बारी यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ६. | प्रभाग क्र१० अंतर्गत पिंप्राळा गावठाण मधील रथ मार्गावर ठिकठिकाणी गटार तयार करणे. ( कुंभारवाडा) |
| ७. | प्रभाग क्र१० अंतर्गत पिंप्राळा गावठाण मधील रथ मार्गावर ठिकठिकाणी गटार तयार करणे. (कोळी वाडा) |
| ८. | प्रभाग क्र१० अंतर्गत पिंप्राळा गावठाण मधील रथ मार्गावर ठिकठिकाणी गटार तयार करणे. (बारी वाडा) |
| ९. | प्रभाग क्र १० अंतर्गत पिंप्राळा गावठाण येथील चौधरी वाडा येथेरस्ताकाँक्रीकरणकरणे |
| १०. | प्रभाग क्र १० अंतर्गत पिंप्राळा गावठाण येथील कोळी वाडा येथेरस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ११. | प्रभाग क्र १० अंतर्गत पिंप्राळा येथील गट नं १९५ मधील गणपती मंदिरते अग्निहोत्री यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| १२. | प्रभाग क्र १० अंतर्गत पिंप्राळा येथील गट नं १९५ मधील गणपती मंदिरते अग्निहोत्री यांच्या घरापर्यंत गटार तयारकरणे |
| १३. | प्रभाग क्र १० अंतर्गत पिंप्राळा येथील असावा नगर येथे गटार तयार करणे. |
| १४. | प्रभाग क्र १० गणपतीनगर येथील सौरभ बाविस्कर ते संजय चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |

| | |
|---|---|
| १५. | प्रभाग क्र १० गणपतीनगर येथील सौरभ बाविस्कर ते संजय चौधरी यांच्या घरापर्यंत गटार तयार करणे |
| १६. | प्रभाग क्र १० गणपतीनगर येथील पवन भावसार यांच्या घराजवळीलरस्ताकाँक्रीकरणकरणे |
| १७. | प्रभाग क्र १० गणपतीनगर येथील पुंडलिक कुंभार ते गजानन बारी यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| १८. | प्रभाग क्र १० गणपतीनगर येथील गजानन बारी ते ससाणे सर यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| १९. | प्रभाग क्र १० अंतर्गत गणपती नगर येथील बारीकराव सोनवणे ते गजानन बारी यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. |
| २०. | प्रभाग क्र १० गणपतीनगर येथील विश्वनाथ धनगर ते अतुल पाटील यांच्या घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| २१. | प्रभाग क्र ३ अंतर्गत श्री कॉलनी मोहन अशोक बऱ्हाटे यांचे घर ते प्रल्हाद आनंदा वाघूळदेघरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| २२. | प्रभाग क्र ३ अंतर्गत श्री कॉलनी मोहन अशोक बऱ्हाटे यांचे घर ते प्रल्हाद आनंदा वाघूळदेघरापर्यंत गटार तयार करणे |
| २३. | प्रभाग क्र ३ अंतर्गत श्री कॉलनी जगदीश अशोक नेमाडे यांचे घर ते सतीश कावळे घरापर्यंत रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| २४. | प्रभाग क्र ३ अंतर्गत श्री कॉलनी जगदीश अशोक नेमाडे यांचे घर ते सतीश कावळे घरापर्यंतगटार तयार करणे |
| २५. | प्रभाग क्र ३ अंतर्गत श्री कॉलणी देवेंद्र चौधरी यांचे घर ते सुनंदा वाणी यांचे घरपर्यंतरस्ताकाँक्रीकरणकरणे |
| २६. | प्रभाग क्र ३ अंतर्गत श्री कॉलणी देवेंद्र चौधरी यांचे घर ते सुनंदा वाणी यांचे घरपर्यंतगटार तयार करणे |
| २७. | प्रभाग क्र ३ अंतर्गत गट नं ७२ पै श्री कॉलनी येथील मनपा ओपन स्पेस पेव्हर ब्लोक बसविणे. |
| २८. | प्रभाग क्र ३ अंतर्गत गट नं ७७/१ मनपा ओपन स्पेस सुशोभीकरण करणे. |
| २९. | प्रभाग क्र १३ अंतर्गत दौलत नगर येथील गट नं ४५०/२ प्लॉट नं २ शेजारील ओपनस्पेस मध्ये सभागृह बांधणे. |
| ३०. | प्रभाग क्र १३ अंतर्गत दौलत नगर येथील गट नं ४५०/२ प्लॉट नं २ शेजारील ओपनस्पेस मध्ये काँक्रीकरणकरणे. |
| ३१. | प्रभाग क्र ३ अंतर्गत गट नं १० विनायक नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३२. | प्रभाग क्र ३ अंतर्गत ज्ञानेश्वर नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३३. | प्रभाग क्र ३ अंतर्गत विनायक नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३४. | प्रभाग क्र ३ अंतर्गत समर्थ नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३५. | प्रभाग क्र ३ अंतर्गत गट नं ८ संभाजी नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३६. | प्रभाग क्र ३ अंतर्गत गट नं ३ ज्ञानेश्वर नगर येथील परिसरात गटार तयार करणे. |
| ३७. | प्रभाग क्र ३ अंतर्गत गट नं ५/१,५/२ समर्थ नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३८. | प्रभाग क्र ३ अंतर्गत खेडी संभाजी नगर येथील परिसरात रस्ताकाँक्रीकरणकरणे. |
| ३९. | प्रभाग क्र ३ अंतर्गत खेडी शिवार समर्थ नगर येथील ओपनस्पेस शेजारील रस्ता तयार करणे. |
| ४०. | प्रभाग क्र ३ अंतर्गत विनायक नगर ओपनस्पेस शेजारील रस्ता तयार करणे. |
| ४१ | प्रभाग क्र १३ अंतर्गत मोहन नगर येथील गट नं ४४८ मधील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४२. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४५६/१ हनुमान मंदिर जवळील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४३. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४५६/१ हनुमान मंदिर जवळील गटार तयार करणे |
| ४४. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४५८/२ शिवतीर्थ अपार्टमेंट जवळील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४५. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४५७ प्रितम पार्क अपार्टमेंट जवळील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४६. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४५७ प्रितम पार्क अपार्टमेंट जवळील गटार तयार करणे |
| ४७. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४४९ मधील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४८. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४४९ मोहन नगर मधील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ४९. | प्रभाग क्र १३ अंतर्गत मोहन नगर मधील रस्ताकाँक्रीकरणकरणे |
| ५०. | प्रभाग क्र १३ अंतर्गत गट नं ४४९ महाबळ मधील मोहन नगर येथे रस्ताकाँक्रीकरणकरणे |

उक्त ०१ ते ५० कामांना सार्व.बांधकाम विभाग यांच्या मागणीनुसार कामांना ना-हरकत दाखला खाली नमुद अटी शर्तीच्या अधिन राहुन देण्यास व ०१ ते ५० कामे सार्व.बांधकाम विभाग, जळगांव यांच्या मार्फत करण्याबाबत मान्यता होवुन ठराव पारित होणेकरीता प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

१. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.

२. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.

३. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.

४. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.

५. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या कॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारीसाठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बार्बीचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.

६. रस्त्यावर मलनिस्सार योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल. रस्ताखाली दबाई झाल्यास आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

७. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे, खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

८. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्टभागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील.
प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

उपरोक्त अटी शर्तीस बंधनकारक राहुन ना-हरकत दाखला देण्यास व तद्नंतर सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ३ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.२८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :- १९४** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/१३७४/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४

३. उपायुक्त (सा.क.) यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखाधिकारी यांचा दि.२७/०९/२०२४ चा अभिप्राय

५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२७/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळांची दुरुस्ती करणेबाबत.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका हद्दीतील मनपा शाळांची दुरुस्ती करणेबाबत आयुक्त यांनी दिलेल्या सूचनेनुसार शिक्षण मंडाळाकडुन शाळांच्या दुरुस्ती करणेबाबत आलेल्या मागणी नूसार संबंधीत प्रभागातील शाखा अभियंता यांनी शाळांचे सर्व्हेक्षण करुन शाळा दुरुस्तीचे अंदाजपत्रके तयार केलेली आहेत त्याची यादी खालील प्रमाणे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजीत रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | प्रभाग क्र.०५ अंतर्गत गंगुबाई यादव मनपा प्राथमिक शाळा क्र.१७ येथे दुरुस्ती करणे. | ४,८६,१९०/- |
| २. | प्रभाग क्र.०३ अंतर्गत कै.भीमराव देशमुख मनपा प्राथमिक शाळा क्र.२४ खेडी येथे दुरुस्ती करणे. | ९,१७,८२५/- |
| ३. | प्रभाग क्र.०२ कांचन नगर मध्ये प्लेसेंटर ओपन स्पेस मध्ये अंगणवाडी करीता टॉयलेट ब्लॉकचे बांधकाम करणे. | ४,२२,६०२/- |
| ४. | प्रभाग क्र.०२ कांचन नगर मध्ये प्लेसेंटर दुरुस्तीकरण करणे. | ९,९७,३८२/- |
| ५. | प्रभाग क्र.०२ अंतर्गत मनपा शाळा क्र.०१ (मराठी) व शाळा क्र.१३ (उर्दु) करीता टॉयलेट बांधकाम करणे. | ३२,०७,६०९/- |
| ६. | मनपा हिंन्दी शाळा क्र.५५ येथे दुरुस्ती व रंगकाम करणे. | ८,९०,०००/- |
| ७. | मनपा ऊर्दु शाळा क्र.१२ येथे टॉयलेट बांधणे व इतर दुरुस्ती करणे. | ८,००,०००/- |
| ८. | प्रभाग क्र.०५ अंतर्गत रामलालजी चौबे शाळेचे वॉटर प्रुफींग व कलरींग करणे. | २,००,०००/- |
| ९. | प्रभाग क्र.०१ अंतर्गत मनपा शाळा क्र.१५ येथे वॉटर प्रुफींग करणे व कलरिंग करणे. | १९,०६,७७७/- |
| | एकुण रक्कम रु :- | ९८,२८,३८५/- |

वरील नमुद यादी प्रमाणे अ.नं.०१ ते ०८ शाळा दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकीय खर्चाची एकूण रक्कम रु.९८,२८,३८५/- इतकी असुन प्रस्तुत कामी येणारा खर्च महिला व बालकल्याण विभागाच्या बजेट तरतुदीतून करणे अनुज्ञेय असल्याने उपरोक्त नमुद कामांसाठी येणारा एकुण खर्च रु.९८,२८,३८५/- मात्र सन २०२४-२५ च्या महिला व बालकल्याण विभागाच्या (५%) निधी व्यतिरिक्त अतिरिक्त निधीची अंदाजपत्रकीय तरतुद करणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(महासभा)**

---

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :- १९५** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./सार्व.बांधकाम विभाग/१३७५/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४

३. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२४ चा अभिप्राय

४. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२४/०९/२०२४ चा अभिप्राय

**विषय :-** एकत्रित अ.नं.०१ ते ११ कामांपैकी अ.नं.०१ चे काम रद्द करुन त्या एकंत्रित कामाची इसारा अनामत परत करणेच्या मान्यतेबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत अहवालातील तक्त्यात नमुद अ.नं.०१ ते ११ कामाचा समावेश असुन या कामाची एकत्रित निविदा प्रसिध्द करुन कार्यादेश क्र.पवडी/२४१/ ०१ ते ११ दि.२१/०२/२०२२ निर्गमित करण्यात आले असून त्यापैकी अ.नं.०१ चे काम सुरुच झालेले नाही. कामाची मुदत १२ महिने होती ती मुदत संपलेली आहे, निधी खर्च करण्यासाठीचा कालावधी देखिल समाप्त झालेला आहे. हुडको परिसरातील अमृत नळ संयोजनाच्या प्रलंबीत प्रश्न अदयाप निकाली निघालेला नाही व त्याशिवाय या भागातील रस्ते काँक्रीटीकरण करणे शक्य / योग्य होणार नाही म्हणून सदर कार्यादेश क्र.पवडी/२४१ दि.२१/०२/२०२२ रद्द करणे आवश्यक आहे.

प्रस्तावातील अ.क्र.०१ ते ११ मधील अ.नं. ०१ चे काम हे नागरी दलीत वस्ती सुधारणा या शासकीय योजनेतुन असुन या कामाचे कार्यादेश देवून ०२ वर्षे पूर्ण झाले आहे. तरी सदरील शासकीय निधीस आता मुदतवाढ मिळणे शक्य नाही व सदरील शिल्लक निधी शासनास वर्ग करणे आवश्यक आहे त्याकरीता संदर्भ क्र.२ मधील प्रस्तावातील अ.नं.१ चे काम रद्द करणेस व प्रस्तावातील अ.नं.२ ते ११ या निविदेचे कामी मक्तेदाराने मनपाकडे जमा केलेली इसारा अनामत रक्कम सदर काम पूर्ण झाले असल्याने (अ.नं.०१ वगळता अ.नं.०२ ते ११ ची कामे पूर्ण झालेली असल्याने) मक्तेदारास परत करणेस मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.२८** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०७** **प्रशासक ठराव क्र :-१९६** **दिनांक :-०७/१०/२०२४**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचेकडील प्रस्ताव जा.क्र./न.र./८३०/२०२४-२५ दि.०७/१०/२०२४

**विषय :-** जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६८/१/१ पैकी या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५७ हायस्कुल या आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मौजे मेहरुण स.नं.१६८/१/१ पैकी या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५७ हायस्कुल या आरक्षणाने बाधीत जमिनीच्या क्षेत्राचे संपादनासंबंधी म.प्रा. व न. र अधिनियमाचे कलम १२७ नुसार खरेदी सुचना जमिन मालक श्री.निरंजन जगन्नाथ पाटील व इतर यांनी दि.२१/१२/२०२३ अन्वये नियोजन प्राधीकरणास दिलेली आहे त्या अनुषंगाने विकास योजना आरक्षणाने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात टि.डी.आर.बाबत जमीन मालक यांना जा.क्र./नर/३०८, दि.०६/०६/२०२४ अन्वये विचारणा केली असता त्यांनी दि.३१/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये टी.डी.आर घेण्यास नकार दिलेला आहे. तद्नंतर मा.प्रशासक ठराव क्र.१३९, दि.०९/०८/२०२४ अन्वये जमिन मालक यांना टि.डी.आर घेणे संदर्भात पुनश्च: प्रोत्साहीत करण्यात यावे अथवा त्यांना UDCPR नियमाअंतर्गत Reservation Accommondation बाबत विचारणा करण्यात यावी याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाकडील अर्जदारास देण्यात आलेले पत्र जा.क्र./नर/६३३, दि.२९/०८/२०२४ अन्वये अर्जदार यांना टि.डी.आर. घेणे संदर्भात तसेच Reservation Accommondation याबाबत कळविण्यात आलेले होते. तथापि, अर्जदार यांनी आवक क्र.१३५१, दि.०३/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये टि.डी.आर. व Reservation Accommondation बाबत नकार दिलेला असुन रोख स्वरुपात मोबदला मिळणे बाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे सदर आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन करणे आवश्यक झालेले आहे.

अर्जदार यांचे मालकीचे मौजे मेहरुण स.नं.१६८/१/१ या जमिनीतुन दर्शविलेले आरक्षण क्र.१५७, हायस्कुल या आरक्षणा खालील जमिनीचे एकुण क्षेत्र ७१७१.०० चौ.मी असुन आरक्षणाने बाधीत जमिनीचे भुसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,जळगांव यांचेकडे सादर करुन भुसंपादन प्रक्रिया ०२ वर्षाच्या आत पुर्ण करणे आवश्यक आहे. या कामी विषयांकीत जमिनीचे सन २०२४-२५ च्या शिघ्रसिध्दगणका मधील दरा नुसार रु.२४००/- प्रति चौ.मी इतके आहे त्या अनुषंगाने भुसंपादन कामी अपेक्षीत खर्च खालील प्रमाणे होईल.

| प्रयोजन | शिवार | स.नं. | भुसंपादन क्षेत्र | शि.सि.गणक दर/चौ.मी | अंदाजीत खर्च |
|---|---|---|---|---|---|
| आ. क्र.१५७, हायस्कुल | मेहरुण | १६८/१/१ पैकी | ७१७१.०० चौ.मी | रु.२४००/- (२०२४-२५) | रू.१,७२,१०,४००/- + रू. १,७२,१०,४००/- |
| | | | | | रू.३,४४,२०,८००/- |

वरील प्रमाणे रू.३,४४,२०,८००/-खर्च अपेक्षीत असुन, संयुक्त मोजणीसाठी येणारा खर्च, व प्रस्तावा अंतर्गत वेळोवेळी येणाऱ्या खर्चास व प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी तथा भुसंपादन अधिकारी,जळगांव यांचेकडेस पाठविणेकामी मान्यता मिळणेबाबत सहाय्यक संचालक, नगररचना, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता प्रस्तावातील खर्चास मंजूरी देणे योग्य होणार नाही. जमिन मालक यांना टि.डी.आर. घेणे संदर्भात पुनश्च प्रोत्साहीत करण्यात यावे अथवा त्यांना UDCPR नियमाअंतर्गत Reservation Accomondation याबाबत सुध्दा पुनश्च विचारणा करण्यात यावी. याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सही/-

**(ज्ञानेश्वर ढेरे)**

**प्रशासक**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**